क्र.प्रन/२९०/२०२६
दि.१३.०३.२०२६

## -: विक्रीची अधिसूचना :-

सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर या कार्यालयाकडील जुने वापरात नसलेले छायांकीत प्रती काढण्याची यंत्रे लिलावाद्वारे विक्री करण्याकामी सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

**लिलावाची तारिख व ठिकाण** **दि.२४.०३.२०२६ रोजी सकाळी १०.३० वा.**
**जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवार**

याद्वारे सूचित करण्यात येते की, या अधिसूचनेतील अनूसूचित नमूद केलेले साहित्य निरूपयोगी ठरविण्यात आलेले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

## -: मालमत्तेची अनुसूची :-

| अ.क्र. | छायांकीत प्रती काढण्याचे यंत्र<br>कंपनी व मॉडेल | खरेदी वर्ष | अंदाजे मुल्यांकित<br>किंमत रू. |
|---|---|---|---|
| १ | Sharp AR5620N Sr.No.33029337 | २०१३ | रू.१०००/- |
| २ | Sharp MXM452N Sr.No.33000946 | २०१३ | रू.१०००/- |
| ३ | Sharp AR5620N Sr.No.33035182 | २०१३ | रू.१०००/- |
| ४ | Sharp AR5631 Sr.No.7502509Y | २०१३ | रू.१०००/- |

**लिलावाकरिता नियम व अटी**

१. वरीलप्रमाणे अनुसूचीत निर्दिष्ट केलेला तपशील या कार्यालयाकडील अभिलेखाप्रमाणे दिलेला आहे.

२. सदरच्या साहित्यांचा लिलाव जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवारात, साहित्य सध्या आहे त्या परिस्थितीत केला जाईल.

३. लिलावातील रक्कम कोणत्या रकमेने वाढवायाची ते विक्रीचे काम चालविण्या-या अधिका-यांकडून ठरविण्यात येईल.

४. विक्रीच्या वेळी उक्त लिलावात स्वारस्य असणा-या सर्व लोकांना जातीने किंवा यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या एजंटमार्फत हजर राहता येईल. तथापि, जिल्हा व सत्र नयायालय, सोलापूर व त्याअधिनस्त न्यायालयात कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांना सदर लिलावात भाग घेता येणार नाही.

५. जो कोणी साहित्यांची सर्वात जास्त किंमत देऊ करेल त्यास सदर साहित्यांचा खरेदीदार ठरविण्यात येईल. बोलिदार लिलावात भाग घेण्यास कायदेशीररित्या सक्षम असला पाहिजे.

६. लिलावावेळी सर्वात जास्त किंमतीच्या बोलीत देऊ केलेली किंमत साहित्यांच्या अंदाजे किंमतीपेक्षा कमी असल्यास सदरची बोली नाकारणे योग्य होईल तेव्हा, लिलावाचे काम चालविणारे अधिका-यांस त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार ती बोली नाकारण्याचा अधिकारी राहील.

७. विक्रीचे काम चालविणा-या अधिका-यास आवश्यक वाटल्यास ते लिलाव स्थगित करण्याची कारणे नमूद करून लिलावाचे काम स्थगित करू शकतील.

८. लिलावादरम्यान साहित्यांची किंमत विक्रीच्या वेळी अगर त्यानंतर विक्रीचे काम चालविणारे अधिकारी सांगतील त्यावेळी दिली पाहिजे, त्यात कसूर केल्यास उक्त मालमत्तेचा ताबडतोब लिलाव करून ती त्याची विक्री करण्यात येईल. अशा परिस्थितीत दुस-या लिलावावेळी जर साहित्यांची किंमत कमी आली तर मूळ लिलावाच्या वेळी पैसे भरण्यात कसूर करणा-या व्यक्तीकडून विक्रीतील तुटीची रक्कम वसूल केली जाईल. संबंधीतांकडून रक्कम वसूल न झाल्यास ती रक्कम सदर व्यक्तीची जंगम मालमत्ता जप्त करून वसूल केली जाईल.

९. लिलाव पूर्ण झाल्यानंतर लिलावाची रक्कम ताबडतोब रोख स्वरुपात न्यायालयमध्ये भरणे आवश्यक आहे.

१०. सदर साहित्य वाहतूक करण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

११. लिलावाबाबतचे सर्व हक्क मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर यांचेकडे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या लिलाव अधिका-यांकडे राखून ठेवले जातील.

आदेशावरून,

सहा. अधिक्षक

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सोलापूर

प्रत प्रसिध्दीकरिता-

१ जिल्हा न्यायालय, सोलापूर नोटीस बोर्ड
२ जिल्हा न्यायालय, सोलापूर अधिकृत संकेतस्थळ
३ दिवाणी न्यायालय व. स्तर, सोलापूर नोटीस बोर्ड
४ जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
५ तहसिलदार कार्यालय, सोलापूर
६ जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर
७ सोलापूर महानगरपालिका कार्यालय, सोलापूर

मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सोलापूर

यांना विनंती करण्यात येते की, सदर विक्रीच्या अधिसूचनेची प्रत उपरोक्त अ.क्र. ३ ते ७ या ठिकाणी प्रसिध्द करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत संबंधीतांस आदेश व्हावा, ही नम्र विनंती आहे.

आदेशावरून,

सहा. अधिक्षक

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सोलापूर

DISTRICT COURT OF SOLAPUR
सत्यमेव जयते
डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर